प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

वायू प्रदूषण मुंबईकरांसाठी 'सायलेंट किलर'

'मुंबई कोहोर्ट स्टडी'च्या संशोधकांनी केलेल्या अभ्यासातील धक्कादायक निष्कर्ष

मुंबई : पुढारी डेस्क

मुंबईसारख्या महानगरात विविध कारणांमुळे वाढलेले वायू प्रदूषण नागरिकांसाठी 'सायलेंट किलर' बनत आहे. हृदय आणि फुफ्फुसाशी संबंधित आजार या प्रदूषणामुळे वाढत चालल्याचे एका अभ्यासात पुढे आले आहे.

वाढते बांधकाम, वृक्षतोड, औद्योगिकीकरण यांसारख्या कारणांनी जगभरात वायू प्रदूषण धोक्याची पातळी ओलांडून पुढे चालले आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार, २०१९ मध्ये या वायू प्रदूषणाने जगभरात ४२ लाख लोकांचा बळी घेतला. यातील ८९ टक्के मृत्यू [illegible] आणि मध्यम उत्पन्न गटातील देशांमध्ये झाले आहेत. गंभीर बाब म्हणजे, वायू प्रदूषण हे मृत्यूला कारणीभूत ठरणारे जगातील दुसरे मोठे कारण बनले आहे. [illegible]

[illegible]

> इंडियन [illegible] इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थचे संचालक डॉ. प्रकाश गुप्ता यांच्या म्हणण्यानुसार, मुंबई समूहाने केलेल्या अभ्यासामध्ये [illegible] होणारे मृत्यू आणि आरोग्यावर होणारे परिणाम पुढे आणले आहेत. त्याचबरोबर आरोग्यावर होणारे इतर धोकादायक परिणामही या समूहाने अभ्यासले आहेत. त्यासाठी उपग्रहाद्वारे केलेल्या निरीक्षणांचा आधार घेतला आहे. मुंबईच्या वायू प्रदूषणाबाबत या अभ्यासात आणखी महत्त्वाचे निष्कर्ष नमूद करण्यात आले आहेत.

> इंडियन [illegible] इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थचे संचालक डॉ. [illegible] यांनी मुंबईच्या धोकादायक वायू [illegible]

प्रदूषित हवेने मुंबईतील अनेक भाग अशा प्रकारे व्यापले आहेत. अनेक कारणांनी हे प्रदूषण वाढतच चालले आहे.

या अभ्यासात संशोधकांनी काढलेले निष्कर्ष

१ सर्व प्रकारचे मृत्यू
- पीएम २.५ या धूलीकणामुळे सर्व प्रकारच्या मृत्यूमध्ये [illegible] टक्क्यांनी वाढ झालेली आढळली.

२ अपघाताशिवाय झालेले मृत्यू
- या प्रकारात हे धूलीकण १४ टक्क्यांहून अधिक मृत्यूंना कारणीभूत ठरतात, असे हे संशोधन म्हणते.

३ हृदयाशी संबंधित आजार
- या धूलीकणांमुळे हृदयाशी संबंधित असलेल्या आजारांमध्ये २९ टक्क्यांनी वाढ झालेली आढळली.

४ फुफ्फुसाचा कर्करोग
- ज्या लोकांमध्ये हे धूलीकण आढळले त्यांना ७३ टक्क्यांहून अधिक फुफ्फुसाच्या कर्करोगाचा धोका आढळला.

[illegible]